18/10/87

# शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती

## १८ ऑक्टोबर १९८७

# राज्य व्यापी भव्य परिषद

### साने गुरुजी स्मारक पर्वती पायथा पुणे

बंधु भगिनींनो,

समन्वय समितीच्या वतीने महाराष्ट्रातील ग्रामीण श्रमिकांची भव्य परिषद १२ डिसेंबर ८४ रोजी कोपरगाव येथे पार पडली या परिषदेला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून चांगलाच प्रतिसाद मिळाला परंतु ग्रामीण श्रमिकांचे प्रश्न सोडविण्याचे संदर्भात राज्य सरकारची भूमिका अद्यापही टाळाटाळीची व अन्यायाची आहे. गेल्या ३ वर्षात समन्वय समितीचे नेते मुख्यमंत्री व मजूरमंत्री यांना अनेकदा भेटले मजूर मंत्र्यांनी किमान वेतनात सुधारणा करण्याचे व किमान वेतनाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पातळीवर समित्या नियुक्त करण्याचे आश्वासन दिले पण ही अद्यापही कागदावरच राहिली आहेत.

**१) किमान वेतन त्वरीत दुप्पट करा**

गेल्या काही वर्षात केन्द्रीय नोकरांचे पगारात वाढ झाली सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना अंतरीम वाढ देण्याचा निर्णय झाला. संघटीत क्षेत्रात अनेक ठिकाणी कामगारांना चांगली पगारवाढ मिळाली व महागाई निर्देशांकाप्रमाणे त्यांच्या महागाई भत्त्यात नियमितपणे वाढ होते. राज्याचे आमदार मंत्री व त्यांचे सचीव यांच्या पगारात व दैनिक भत्त्यात फार मोठी वाढ केली आहे पण शेतमजूरांच्या किमान वेतनात मात्र गेल्या पाच वर्षात एक पैशाचीही वाढ झाली नाही. स्वतःला पुरोगामी म्हणून घेणारे महाराष्ट्र सरकार तर या बाबत इतर सर्व राज्यांच्या मागे आहे २ महिन्यापूर्वी दिल्ली येथे राज्य मजूर मंत्र्यांची परिषद झाली तेव्हा सर्व देशभर शेतमजूरांचे किमान वेतन कमीत कमी ११ रुपये करावे अशी घोषणा केन्द्रीय मजूर मंत्र्यांनी केली नुकतेच कर्नाटक सरकारने आपल्या राज्यात शेतमजूरांचे किमान वेतन १२ रुपये ठरविले आहे. ओरिसा व राजस्थान या सारख्या अविकसीत राज्यांनी देखील १० व ११ रुपये किमानवेतनाचे दर ठरविले आहे. मध्यप्रदेश व बंगाल यांनी राहणी निर्देशकांप्रमाणे विशेष भत्ता देण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्रात मात्र हे वेतन वेगवेगळ्या विभागामध्ये ६ रु. ७ रु. ८ रु. व १० रुपये रोज असे आहे. एकूण महाराष्ट्रापैकी ८०% क्षेत्र ६ व ७ रुपये मिळणाऱ्या विभागातच समाविष्ठ होते. किमानवेतन कायद्याखाली महाराष्ट्र राज्याने देखील इतर धंद्यामध्ये महागाईच्या भरपाईसाठी विशेष भत्ता देण्याची सोय केली आहे. परंतु शेतमजूरांना मात्र महागाई भयानक वाढलेली असूनही त्यांच्या वेतनात कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. १९८२ च्या पागे समितीच्या अहवालात शेतमजूरांच्या किमान वेतनाचा दरवर्षी फेरविचार करावा अशी शिफारस केली होती पण एवढी साधी शिफारस देखील राज्य सरकारने फेटाळून लावली. म्हणून आज आपली अशी मागणी आहे की, शेतमजूरांच्या किमान वेतनात तावडतोब दुप्पटीने वाढ करून १५ व्या मजूर परिषदेने मान्य केलेल्या किमान गरजा, आणि प्रत्येक प्रौढ व्यक्तीला लागणारी किमान ३२०० कॅलरी अन्नाची गरज व कुटुंबात एकच व्यक्ती मिळवती असते ही तत्त्वे आधारभूत धरून शेतमजूरांचे किमान वेतनाचे दर नव्याने ठरवून द्यावेत व ते महागाई निर्देशकांशी जोडून त्यात महागाई प्रमाणे नियमीत वाढ करावी.

**२) विखे समितीवर बहिष्कार टाका :**

राज्य सरकारने १५ जुलै १९८७ रोजी शेतमजूरांच्या किमान वेतनाची फेररचना करण्यासाठी जी कमिटी नेमली आहे ती शेतमजूरांच्या डोळ्यात निव्वळ धुळफेक आहे किमान वेतन कायद्याप्रमाणे अशा कमिटीवर कामगार व मालक यांचे समसमान प्रतिनिधी असावेत आणि समितीचा अध्यक्ष हा अपक्ष असावा अशी तरतूद आहे. पण १५ जुलै ८७ रोजी सरकारने नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्ष खासदार बाळासाहेब विखे पाटील हे बडचा बागायतदारांचे व साखर कारखानदारांचे प्रतिनिधी असून ते कोणत्याही परिस्थितीत अपक्ष ठरू शकत नाहीत याउलट या समितीवर शेतमजूरांच्या संघटनांचा एकही प्रतिनिधी घेतलेला नाही. त्यामुळे या समितीकडून शेतमजूरांना कोणत्याही प्रकारे न्याय्य मिळण्याची शक्यता नसल्याने समन्वय समितीने या समितीच्या कामकाजावर बहिष्कार टाकला असून समितीच्या कायदेशीरपणातही उच्च न्यायालयात आव्हान देण्याचे ठरविले आहे.

**३) वन कामगारांचे किमान वेतन :**

महाराष्ट्र शासनाची ग्रामीण असंघटीत श्रमिकांना किमानवेतन देण्याचे संदर्भात धोरण किती अन्यायाचे आहे याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे वन कामगारांना १५ मे १९८६ रोजी शासकीय अधिसुचनेनुसार कमीत कमी रोज १४ रूपये रोज द्यावे असे आदेश जारी केले, असताना शासनाच्या वन खात्यानेच ते धुडकावून लागले आहेत या संदर्भात लेबर कोर्टाने दिलेल्या निर्णयाची देखील अंमलबजावणी शासकीय अधिकारी करत नाहीत शासनाच्या या वृत्तीचा निषेध करीत असून १५ मे ८६ च्या आदेशाप्रमाणे सर्व वन कामगारांना किमान वेतन लागू करून मागील सर्व फरक त्वरीत द्यावा. अशीही आपली मागणी आपली आहे.

**४) रोजगार हमी विषयी भूमिका :**

या वर्षी लागोपाठ ४ थ्या वर्षी दुष्काळ पडला आहे धरणे पूर्णपणे भरलेली नाहीत त्यामळे सर्वत्र कामांची तातडीने आवश्यकता आहे आम्ही मागेल त्याला काम देव व त्यासाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही अशा वल्गना महाराष्ट्र शासन करीत असले तरी प्रत्येक्षात रो ह. यो ची कामे काढली जात नाहीत उलट चाल कामे बंद करण्याचे आदेश दिले जात आहे या वर्षी पाऊस उशीरा पडल्यामुळे खरीपाची पिके हातची गेली आहेतच आणि अद्यापही पाऊस नसल्याने रब्बी हंगामातही पिके येण्याची आशा राहिलेली नाही त्यामळे आज सर्वत्र अल्पभूधारक–शेतमजूर दलीत–आदीवासी आणि कित्येक ठिकाणी मध्यम शेतकऱ्यांना देखील रोजगाराची गरज आहे. अशा परिस्थितीत कामे सुरू करण्याऐवजी शेतकऱ्यांचे व शेती महामंडळाचे पाणी कमी करण्यात येत आहे त्यामुळे काम मागणाऱ्यांची संख्या बागायत भागात देखील वाढत आहे परंतू बागायती भागात कामे काढावयाची नाहीत असे उघड उघड बेकायदेशीर धोरण शासनाने स्वीकारलेले आहे शेती महामंडळाला यावर्षी पाणी न मिळाल्यामळे त्यांचेकडे काम करणाऱ्या सुमारे २० हजार रोजदारीवरील कामगारांना काम नाही त्यांना जर उपासमारीपासून वाचवायचे असेल तर त्या भागातही रोजगार हमीची कामे त्वरीत सुरू केली पाहिजेत असे न करता उलट रोजगाराची मागणी करणाऱ्यांना ४ नंबरचे फॉर्म न देणे आणून दिलेल्या फॉर्मचा स्विकार न करणे इत्यादी बेकायदेशीर कामे शासकीय अधिकारी सर्रास करत असून रोजगार हमी कायदयात सुरूंग लावला जात आहे.

**५) भूमिहिनांवर अत्याचार :**

दुष्काळ आणि बेकारी याच्याशी आपल्या परिने सामना देऊन आपली उदरनिर्वाहाची सोय करण्यासाठी दलित आदिवासी, भटक्याजाती व आर्थिक दर्बळ घटकातील लोकांनी सरकारी पडीक व गायरान जमिनीवर पिके घेतली आहेत. अतिक्रमिकांच्या जमिनी त्यांच्या नावे करून द्याव्यात व त्यांच्या पिकांना संरक्षण द्यावे असा कायदा व शासनाचा आदेश असूनही वनखात्याचे व महसूल खात्याचे अधिकारी व ग्रामीण वरिष्ठ समाजातील धनिक लोक आपल्या गुंडाकरवी त्यांच्यावर अमानूष अत्याचार करीत आहेत गेल्या काही महिन्यातील पुढील घटनावरून हे सहज लक्षात येते. अमरावतीजवळ मंगरूळ दस्तगीर व नाशिक येथील मोर्चावरचा गोळीबार, अंबड तालुक्यातील लिंबोणी व जळगावजवळील आव्हाणे तसेच ठिकठिकाणी त्यांच्यावर हल्ले करून त्यांची पिके उध्वस्त करण्याचे सत्रच चालू झाले आहे. या घटना म्हणजे शेतकरी शेतमजूर आर्थिक-सामाजिक घटकांच्या चळवळीवरील दडपशाहीच आहे. याचा संघटित मुकाबला करण्याची गरज आहे.

**वीस कलमी कार्यक्रम**

शासनाने २० कलमी कार्यक्रमामध्ये भूमिहिन व दारिद्रय रेषेखालील घटकांसाठी अनेक योजना जाहीर केल्या. परंतु त्या प्रत्यक्षात लोकांच्या पदरात पडत नाहीत कारण त्यांच्या मतदार याद्या किंवा दारिद्रय रेषेखालच्या लोकांच्या ८–१० वर्षे तेथे राहूनही याद्यात नावेच नाहीत. बेघरांना घरे देण्याची योजना आहे. परंतु बेघरांच्या नोंदीच नीट नाहीत लोकांना घरे तर सोडाच गावठाणही नाही. त्यामुळे गावातील सधनांच्या मेहरबानीवर अवलंबून रहावे लागते. रेशन कार्डे नसल्याने जीवनावश्यक वस्तु स्वस्त धान्य दुकानातून मिळू शकत नाहीत शासनाच्या अकार्यक्षमता व दिरंगाईमुळे भूमिहिन व आर्थिक दुर्बलांना त्यांचा लाभ मिळू शकत नाही. म्हणून या योजनांची अंमलबजावणी जोखपणे व तत्परतेने व्हावी अशी मागणी आपण करत आहोत.

**व्यापक जनआंदोलनाची गरज**

शेतमजूरांचे किमान वेतन, रो. ह. यो. वर मागेल त्याला काम, भूमिहिनाना जमिनी, हस्तातरीत जमिनीचा प्रश्न, दलितावरील अत्याचार व दडपशाही बेघरांना घरे व गावठाण, वन कामगारांचे प्रश्न व कोळसा भट्टी कामगारांचे प्रश्न, अशा अनेक प्रश्नावर चळवळ संघटीत करण्याची गरज आहे. केवळ कायद्यामार्फत आपला न्याय मिळेल अशा भ्रमात राहून चालणार नाही या लढ्याच्या तयारीचा भाग म्हणून पुणे येथे रविवार दि. १८ ऑक्टोबर ८७ रोजी साने गुरूजी स्मारक पर्वती पायथा पुणे येथे महाराष्ट्रातील अल्पभूधारक शेतकरी शेतमजूर–दलीत–आदिवासी, बेघर, भूमीहीनाची एक भव्य परिषद आयोजित केली. आहे या परिषदचे उद्घाटन समितीचे एक निमंत्रक **साथी बा. न. राजहंस** करणार असून **प्रकाश आंबेडकर, कॉ दत्ता देशमुख, आमदार सुबाष देशमुख, कॉ चंद्रगुप्त चौधरी** आदी ग्रामीण श्रमिकांच्या चळवळीतील नेते परिषदेला मार्गदर्शन करतील परिषदेचा समारोप समितीचे निमंत्रक **कॉ संतराम पाटील** हे करणार आहेत.

| | |
|---|---|
| शेतकरी शेतमजूर पंचायत (महाराष्ट्र) | महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद, |
| म. रा. शेतमजूर युनियन (मार्क्सवादी) | इंडियन फेडरेशन ऑफ बिल्डींग अॅण्ड वुड वर्कर्स |
| शोषीत जन आंदोलन | श्रमिक संघटना–शहादे |
| भूमि सेना, | म. रा. शेतमजूर युनियन (भा. क. प.) |
| गरीब डोंगरी संघटना | कष्टकरी संघटना |
| रचनात्मक संघर्षसमिती (महाराष्ट्र) | छात्र युवा संघर्ष वाहिनी |
| म. रा. शेजमजूर युनियन (लालबावटा) | युवक क्रांती दल |
| जागृत युवक संघटना | श्रमजीवी संघटना–ठाणे |
| म. रा. शेतमजूर संघटना | शोषीत शेतकरी कष्टकरी कामगार मुक्ती संघर्ष |
| लोक समिती | फलटण तालुका शेतमजूर युनियन साखरवाडी |
| रोजगार हमी कामगार संघ पुणे | |